# इंदिरा आवास योजनेचा आढावा

**सचिन श्रीरंग चव्हाण**, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

भारताच्या राज्यघटनेने भारतातील सर्व नागरींकासाठी अन्न, वस्त्र, निवारा, या मानवाशी निगडीत असणाऱ्या महत्त्वाच्या गरजांची पुर्तता करणे शासनाचे कर्तव्य मानलेले असून आजही या देशातील दारिद्रिय रेषेखालील लोक अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या महत्त्वाच्या गरजा पुर्ण करु शकत नाहीत हे अत्यंत विदारक परिस्थितीत दारिद्रियामध्ये जीवन जगत आहेत.

भारताच्या राज्यघटनेनुसार त्यातील तरतुदीनूसार गरजांची पुर्तता करणे ही जबाबदारी शासनाची असते. आणि आपल्या कर्तव्याला जाणून शासन गरीब, आर्थिक आणि सामाजिकदृष्टया मागास जनतेला त्यांच्या असणाऱ्या मुलभूत गरजांची पुर्तता करण्यासाठी विविध योजना राबवत असते. भारतातील ग्रामीण भागातील दारिद्रिय रेषेखालच्या कुटूबांच्या निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी इंदिरा आवास योजनेची निर्मिती केली गेली सदरची इंदिरा आवास योजनेची निर्मिती केली गेली.

**आवास योजनांची पार्श्वभूमी**

घर अथवा निवारा ही मानवाची एक मुलभूत गरज आहे. मानवाला जीवन जगण्यासाठी घर एक महत्वपूर्ण बाब आहे. स्वमालकीचे घर असणे ही बाब समाजात एक विशिष्ठ दर्जा प्राप्त करून देते. स्वमालकीचे घर अथवा निवारा नसणे ही बाब समाजात व्यक्तीची एक वेगळी ओळख निर्माण करते. स्वमालकीचे घर अथवा निवारा नसणे ही बाब व्यक्तीच्या मनात पोरकेपणाची किंवा अनाथ असल्याची भावना निर्माण करते. असुरक्षिततेची भावना निर्माण करते. बेघर व्यक्तीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोण हा वेगळा असतो. त्याला समाजाकडून योग्य ते मानसन्मान, सामाजीक दर्जा, आपलेपणाने स्विकारले जाण्याची भावना मिळत नाही. ज्या समाजात अथवा देशात बेघर व्यक्तींची संख्या जास्त असते तो समाज अप्रगत किंवा विकासाची गरज नसलेला समजला जातो. देशातील शासनव्यवस्था आपल्या नागरीकांची मुलभुत गरज पुरवू शकत नाही याचे ते प्रतिक असते.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाच्या माध्यमातून अन्न, वस्त्र, निवारा हया मानवाच्या मुलभुत गरजा मानल्या गेल्या व त्या पुर्ण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. १९५७ मध्ये समुदाय विकास चळवळीचा एक भाग म्हणून ग्रामीण गृहनिर्माण योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत घरकुल बांधकामासाठी घरकुल उभारणी करणाऱ्या व्यक्तीला जास्तीत जास्त रू. ५०००/— पर्यत कर्जाची सोय करण्यात आली. ग्रामीण गृहनिर्माण योजनेअंतर्गत पाचव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सन १९८० पर्यत ६७००० घरकुलांची निर्मीती करण्यात आली.

१९७२—७३ मध्ये लोकसभेच्या अंदाज समितीने, आपल्या ३७ व्या अहवालात नमुद करतांना असे म्हटले आहे की,या मंडळाला आपल्या अहवालात नमुद करतांना अत्यंत दु:ख होत आहे की, एकुण भारताच्या लोकसंख्येपैकी ८३ टक्के लोकसंख्या ही भारतातील खेडयात राहते आणि यातील ७३ टक्के ग्रामीण जनता ही असमाधानकारक अशा कच्च्या घरांमध्ये राहत आहे. आणि असे असून देखिल ग्रामीण भागातल्या घरकुलांच्या समस्येची सरकारने फारशी दखल घेतली नाही. वरील आयोगाच्या शिफारशींची दखल घेत भारत सरकारने ग्रामीण भागातील जनतेसाठी पक्क्या घरांची योजना सुरू केली, आणखी एक घरकुल योजना चवथ्या पंचवार्षिक योजने दरम्यान आखली गेली होती, पण नंतर १ एप्रिल १९७४ पासून राज्य क्षेत्राकडे हस्तांतरित केलेली “घरासाठी जागा व बांधकाम सहाय्य योजने” चा अंतर्भाव होतो.

इंदिरा आवास योजनेची सुरूवात इ.स. १९८० च्या सुमारास ग्रामीण रोजगार या ग्रामीण विकासाच्या योजनेतून झाली घरांची निर्मीती करणे अथवा घरांचे बांधकाम करणे ही

एक महत्वपूर्ण कृती योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम या योजनेची सुरूवात इ.स. १९८० मध्ये झाली. ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजनाया योजनेची सुरूवात १९८३ मध्ये झाली. पण तरी सुध्दा तोपर्यंत ग्रामीण भागातील घरांसाठी कोणतीही स्पष्ट स्वरूपाची किंवा निश्चीत स्वरूपाची योजना राज्याकडे नव्हती. काही राज्यांना मात्र राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजनाया योजनेतील रक्कमेचा काही भाग घरांच्या निर्मितीकरीता दिला. जुन १९८५ मध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामीण भुमिहीन रोजगार हमी योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी काही भाग अनुसूचीत जाती/जमातीच्या लोंकाकरीता व मुक्त वेठबिगार लोंकांकरीता व घरकुल बांधण्याकरीता बाजूला काढण्यात आला. अशा प्रकारे इंदिरा आवास योजनेची सुरूवात ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजनेची उपयोजना म्हणून झाली. सन १९८५ ते १९९६ या काळापर्यंत इंदिरा आवास योजना एक उपयोजना म्हणून राबविली जात होती. या दरम्यान शासनाकडून एप्रिल १९८९ मध्ये जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली. त्यावेळी इंदिरा आवास योजना ही जवाहर रोजगार योजनेची एक उपयोजना म्हणून कार्यरत होती.

१९९३—९४ मध्ये इंदिरा आवास योजनेची व्याप्ती वाढविली गेली. आतापर्यंत इंदिरा आवास योजनेचा लाभ फक्त दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती/जमातींच्या लोकांनाच मिळत होता. पण आता तो लाभ दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचीत जाती जमातींच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना देखिल मिळण्याची तरतूद करण्यात आली. पुर्वी जवाहर रोजगार योजना अंतर्गत मिळणाऱ्या निधीपैकी ६ टक्के वरून १० टक्के वर करण्यात आली. पण हे करीत असताना एक अशी अट टाकण्यात आली की, एकूण निधीपैंकी ग्रामीण भागात राहणाऱ्या दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचीत जाती जमातीच्या लोकांकरीता ४ टक्के पेक्षा अधिक निधी खर्च होता कामा नये. नंतर शासनाच्या निर्णयानुसार ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील लोकांची घरांची गरज लक्षात घेवून इंदिरा आवास योजना ही रोजगार हमी योजनेपासून विभक्त करण्यात आली. १ जानेवारी, १९९६ पासून इंदिरा आवास योजनेला एक स्वतंत्र योजना म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

**इंदिरा आवास योजनेचा उद्देश**

“इंदिरा आवास योजना” ही ग्रामीण गरीब लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी, ग्रामीण विकास मंत्रालयाची एक मार्गदर्शी योजना आहे. भारत सरकारने १ जानेवारी १९९६ पासुन या योजनेला स्वतंत्र दर्जा दिलेला असून ही योजना राज्यातील ग्रामीण भागात स्वतंत्रपणे राबविली जाते. या योजने अंतर्गत निधी वितरणामध्ये केंद्र शासनाचा ७५ टक्के तर राज्यशासनाचा २५ टक्के हिस्सा आहे. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबासाठी घरबांधणी हे या योजनेचे उद्दिष्ठ आहे.या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ६० टक्के अनुदान अनुसूचीत जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी उपलब्ध केले जाते. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातींच्या व्यक्तींना घरकुल बांधण्यासाठी आर्थिक मदत देण्यासोबतच मुक्त वेठबिगार मजुरांना घर बांधकामाकरीता आर्थिक मदत देणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

ग्रामीण भागात राहणाऱ्या दारिद्रय रेषेखालील विकलांग व्यक्तीकरीता ३ टक्के आरक्षण इंदिरा आवास योजनेअंतर्गत ठेवण्यात आले आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत दारिद्रयरेषेखालील अल्पसंख्यांक व्यक्तीसाठी १५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**इंदिरा आवास योजना कार्यक्रमाची अंमलबजावणी**

इंदिरा आवास योजना या कार्यक्रमाची अमंलबजावणी जिल्हा परिषद किंवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत करण्यात येईल. जिल्हा परिषद किंवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्या आर्थिक वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत किती घरे बांधावयाची हे नक्की करते. हा निर्णय जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत तालुका पातळीवर व तेथून ग्रामपंचायतींना कळविला जातो. ग्रामपंचायती त्यांच्याकडे असलेल्या दारिद्रय रेषेखालील लोकांच्या यादीतून गुणानुक्रमानुसार निवारा नसलेल्या लोकांची यादी तयार करतात. अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांची स्वतंत्र

यादी तयार करण्यात येते. त्यामुळे त्यांना एकूण घरांपैकी ६० टक्के घरे दिली जातात. दुसरी संभाव्य यादी बिगर अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांची असते. संबंधीत याद्या तयार झाल्यानंतर त्या ग्रामसभेत मंजूर करुन घेण्यात येतात. ग्रामसभेत याद्यांना मंजूरी दिली जाते. म्हणजे त्यांना अंतिम स्वरुप मिळते. त्यानंतर अन्य कोणत्याही मंजूरीची आवश्यकता नसते. जिल्हा परिषद/पंचायत समिती यांच्याकडे लाभार्थी म्हणून निवडलेल्या व्यक्तीची यादी पाठविण्यात येते. लाभार्थी म्हणून निवड झालेल्या व्यक्तींची यादी संबंधीत ग्रामपंचायतीमध्ये किंवा गावाच्या दृष्टीने अन्य मध्यवर्ती जागा असलेल्या भागात लावण्यात येते.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/जिल्हा परिषद शासनाच्या निर्देशानुसार, मार्गदर्शक तत्वानुसार त्या आर्थिक वर्षात आपल्या जिल्हयात किती घरे बांधायची हे निश्चीत करत. ठरविलेल्या उद्दिष्टयानुसार उद्दिष्टयपूर्तीकरता प्रत्येक तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील लोकाची संख्या व इतर सर्व बाबी विचारात घेवून त्या–त्या तालुक्यातील किती घरे बांधायची हे ठरविले जाते. त्या संदर्भात त्या–त्या तालुक्यातील ग्रामपंचायतींना सुचित केले जाते. नंतर प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्रामसभेच्या माध्यमातून इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थ्याची निवड करताना प्राधान्यक्रम दिला जातो. या करिता पंचायत समितीच्या शिफारशींची किंवा संमतीची आवश्यकता नसते. तरीसुध्दा निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी माहितीकरिता ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे पाठविली जाते. ही सुधारणा इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये ०१/०४/१९९८ पासून अमलात आली.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीत प्राधान्य**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत खालील पध्दतीने लाभार्थ्यांना निवड प्रक्रियेत प्राधान्य दिले जाते.

१. मुक्त वेठबिगार कामगार

२. ग्रामीण भागात राहणारे दारिद्रयरेषेखालील घराची आवश्यकता असणारे अनुसुचित जाती/अनुसूचित जमातीचे व्यक्ती

अ) जातीयवादाचे/जातीय विषमतेचे बळी ठरलेले अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीचे लोक

ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती मधील विधवा स्त्री किंवा अविवाहीत स्त्री

क) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती मधील व्यक्ती की जे पुर, आग, धरणीकंप, भूकंप, वादळ किंवा यासारख्या अन्य नैसर्गिक आपत्तीने बाधीत झालेले आहेत.

ड) अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीमधील घरांची आवश्यकता असणारे अन्य बेघर लोक.

३. ग्रामीण भागात राहणारे दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे व अन्य बेघर लोक/व्यक्ती

४. अपंग किंवा विकलांग व्यक्ती

५. देश संरक्षणार्थ विरमरण आलेले भारतीय लष्करातील जवानांचा किंवा लष्कर समकक्ष दलातील जवानांच्या विधवा किंवा कुटूंबातील सदस्य तसेच भारतीय लष्करातील निवृत्त झालेले जवान आणि लष्कर समकक्ष दलातील निवृत्त झालेले जवान.

६. विकास योजनेकरिता विस्थापीत केल्या गेलेल्या व्यक्ती, पोट भरण्यासाठी जागोजागी स्थलांतर करणाऱ्या व्यक्ती, या व्यक्ती मात्र दारिद्रय रेषेखालील बेघर व्यक्ती असल्या पाहिजेत.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांचे वाटप**

इंदिरा आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ लाभार्थी कुटूंबातील महिलेच्या नावाने दिला जातो किंवा लाभ पती आणि पत्नी या दोन्हींच्या संयुक्त नावेसुध्दा दिला

जातो. परंतू जर एखाद्या कुटूंबात सक्षम किंवा पात्र महिला उपलब्ध नसेल तर घरकुलाचा लाभ कुटूंबातील पुरुषाच्या नावाने दिला जातो.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाची जागा**

इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणारी घरकुले प्रामुख्याने लाभार्थ्यांच्या मालकी हक्काच्या किंवा स्वत:च्या जागेवर बांधण्यात येतात. जर लाभार्थ्याजवळ स्वत:ची मालकी हक्काची जागा नसेत, त्या वेळेस अशा लाभार्थ्यांच्या गटाला ग्रामपंचायतीच्या मालकी हक्काच्या जागेवर /गावठाणच्या जागेवर अथवा गावाच्या पांढरीच्या जागेवर जागा दिली जाते. या लाभार्थ्यांची वस्ती ज्या ठिकाणी तेथे त्यांना रस्ते, विज, पाणी, सांडपाण्याच्या गटारींची सुविधा पुरवणे सोयीचे असते.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत घर बांधणीत लाभार्थ्यांचा सहभाग**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थी हा स्वत: घर बांधकामात सहभागी झाला पाहिजे. लाभार्थ्यांने स्वत:च बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची व्यवस्था, घर बांधकामासाठी आवश्यक असणारे कारागीर व अन्य साहित्याची व्यवस्था केली पाहिजे. लाभार्थ्यांला त्याचे स्वत:चे घराचे बांधकाम करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले जाते.

घराचे बांधकाम करताना लाभार्थींचा सहभाग असायला हवा. हा उद्देश साध्य करण्यासाठी, लाभार्थीला बांधकाम सामग्री खरेदी करणे. कुशल कामगार कामावर लावणे याकरिता स्वत: व्यवस्था करता येईल. तसेच कुटुंबातील सदस्यांची मजूर म्हणून मदत घेता येईल. घराचे बांधकाम करण्याच्या पध्दतीबाबत लाभार्थांना पूर्ण स्वातंत्र्य राहील. जिल्हा परिषदा/जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण लाभार्थीला बांधकाम सामग्री किफायतशीर दरामध्ये उपलब्ध करण्याकामी मदत करु शकतात. यामुळे खर्चात कपात होईल, बांधकामाच्या दर्जाची खात्री राहील जेणेकरुन लाभार्थीस अधिक समाधान मिळून घर संतोषजनक बनेल. अशाप्रकारे घराच्या बांधकामाची जबाबदारी स्वत: लाभार्थींवर राहील.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाकरिता करण्यात येणारे अर्थसहाय्य**

दिनांक ०१/०४/२००९ पासून इंदिरा आवास योजनेच्या नवीन मंजूर घरकुलांची किंमत रु. ७०,०००/— (अक्षरी रुपये सत्तर हजार मात्र) एवढी निश्चित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| | |
|---|---|
| भारत सरकार अनुदान (रु. ४५,०००/— मध्ये ७५ टक्के प्रमाणे) | ३३,७५० |
| महाराष्ट्र शासन अनुदान (रु. ४५,०००/— मध्ये २५ टक्के प्रमाणे) | ११,२५० |
| महाराष्ट्र शासन अतिरिक्त अनुदान | २३,५०० |
| लाभार्थी हिस्सा | १,५०० |
| एकूण | ७०,००० |

**निधी वाटपाचे निकष व विभाजन**

इंदिरा आवास योजना ही केंद्रशासनामार्फत राबवीले जाते. सदरची योजना पारदर्शकपणे राबविण्यासाठी सदर योजनेचे अनुदान लाभार्थीपर्यंत पोहचवण्यासाठी असणाऱ्या निधीचे विभाजन केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व लाभार्थी या स्तरावर केले जाते. इंदिरा आवास योजना ही केद्र शासनाची पुरस्कृत योजना असून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील निधी खर्च प्रमाण ७५:२५ असे आहे. परंतु उत्तर पूर्व राज्ये व सिक्कीम राज्य येथे हेच निधी खर्चाचे प्रमाण ९०:१० असे आहे. केंद्र शासित प्रदेशात या योजनेवरील सर्व खर्च केंद्र सरकार करते.

**लाभार्थींना रक्कम प्रदानाची प्रक्रिया**

लाभार्थीला रकमेचे प्रदान सवितरीत तत्त्वावर करण्यात यावे व ते कामकाजाच्या प्रगतीवर अवलंबून असावे. लाभार्थीला संपूर्ण रक्कम एकरकमी प्रदान करु नये. कामाच्या प्रगतीनुसार द्यावयाचे हप्ते राज्य शासनाकडून अथवा जिल्हा स्तरावर ठरविण्यात यावे. लाभार्थीस दोन हप्त्यात उचल देणे आदर्श राहील. पहिला हप्ता अर्थ सहाय्याच्या मंजूरीसोबत द्यावा व दुसरा हप्ता हा बांधकाम दरवाज्यावरील घरापर्यंत झाल्यावर द्यावा.

इंदिरा आवास योजनेचा निधी लाभार्थीच्या बॅक खात्यात जमा करावा यासाठी जेव्हा लाभार्थींची निवड होते तेव्हाच त्यांचे कोणत्या बॅकेत अथवा पोस्ट ऑफीसमध्ये बचत खाते नसल्यास, खाते उघडण्यास सांगावे व अशा बॅक खात्यांचा नंबर ग्रामपंचायत/गटविकास कार्यालय व जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाना कळविण्यात यावा.

**इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना कर्जाची सुविधा**

शासनामार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे उपलब्ध झालेल्या एकूण निधीपैकी २० टक्के निधी हा कच्च्या अवस्थेत बांधलेल्या घरकुलांचा दर्जा उंचावण्यासाठी खर्च करता येतो. या करिता काही प्रमाणात सुट(सबसीडी) असलेले कर्ज देखील वित्तीय संस्थांकडून (बॅकेकडून) इच्छूक लाभार्थ्याना पुरविले जाते. यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची भूमिका महत्वपूर्ण असते. अर्थात सबसिडीच्या स्वरुपातले कर्ज घेताना काही अटी असतात, काही निकष लावलेले असतात.

**इंदिरा आवास योजनेच्या विविध प्रक्रिया**

इंदिरा आवास योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी त्यांची विविध पातळीवर वेगवेगळया प्रक्रिया शासन स्तरावर कराव्या लागतात. त्यामध्ये घरकुलाची रचना, संकल्प चित्र, कमीखर्चाच्या तंत्राचा वापर इत्यादी प्रक्रिया आपणाला पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांची रचना**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलांची रचना विशिष्ठ पध्दतीची असावी असा कुठलाही आग्रह करण्यात आलेला नाही किंवा रचनेचा प्रकार योजनेमार्फत ठरवून दिलेला नाही. मात्र घराचे क्षेत्रफळ (प्लिन्थ) २० स्केअर मिटर पेक्षा कमी असता कामा नये. घराची रचना पूर्णतः लाभार्थ्यांच्या मर्जीवर अवलंबून असेल. स्थानिक परिस्थितीचा, वातावरणाचा विचार करुन लाभार्थी घरकुलाची रचना ठरवू शकतो. स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह, निर्धुर चुलीची व्यवस्था, घरकुल हवेशीर राहण्यासाठी खिडक्यांची व्यवस्था लाभार्थी आपल्या मर्जीप्रमाणे तसेच तेथील भौगोलिक आणि नैसर्गिक वातावरणाचा विचार करुन, स्थानिक परिस्थिती विचारात घेवून ठरवू शकतो.

**संकल्प चित्रांचा प्रकार**

प्रत्येक राज्य शासनाने परिशिष्टामध्येदिलेल्या तत्वप्रणाली नुसार बांधकाम तंत्र व बांधकाम साहित्याचा विचार करुन संकल्पचित्राची निवड करावी. एकाच प्रकारच्या संकल्पचित्राची निवड करणे आवश्यक नाही. एकापेक्षा अनेक संकल्पचित्रांची निवड स्थानिक परिस्थितीनुसार केली जाऊ शकते. इंदिरा आवास योजने अंतर्गत बराचा आराखडा व संकल्पचित्राचा प्रकार हा स्थानिक परिस्थितीवर व लाभार्थीच्या पसंतीवर अवलंबून राहील. स्थानिक हवामानानुसार पुरेशी जागा, स्वयंपाक घर, खेळती हवा, स्वच्छताविषयक सोयी, बिनधुराच्या चुली इत्यादींची गरज, सामाजिक मते, पसंती व सांस्कृतिक दृष्टीकोन लक्षात घेवून लाभार्थीच्या इच्छेनुसार घराचे संकल्पचित्र तयार करण्यात यावे. विकलांग व्यक्तींना घरामध्ये मुक्त वावर करणे सोपे जावे यासाठी त्यांच्या घरांचे बांधकाम अडथळयापासून मूक्त ठेवण्याच्या संकल्पनेचा समावेश करण्यात यावा. आग, पूर, चक्रीवादळ, भुकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीना वारंवार तोंड द्याव्या लागणाऱ्या भागामध्ये संकल्पचित्र आखताना आपत्तीरोधक बाबींचा त्यात समावेश करण्याकरिता प्रोत्साहन देण्यात यावे.

राज्य शासनांनी मंजूर केलेल्या संकल्पचित्रांच्या प्रकाराबाबत पुरेशा गवंडयांना व इतर कारागिरांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी त्या राज्य शासनानी घ्यावी. तसेच या संकल्पचित्राप्रमाणे बांधण्यात येणाऱ्या घरासाठी लागणाऱ्या सामग्री, हत्यारे यांची उपलब्धता जिल्हयामध्ये असल्याची खात्री राज्य शासनानी करुन घ्यावी. यासाठीच्या शिक्षण प्रणालीमुळे केवळ गवंडयांचे प्रशिक्षण देऊन चालणार नाही तर लाभार्थीचे ही प्रशिक्षण व्हावे.

**घरांचा दर्जा**

कायमस्वरुपी भिंती व छत असणारी पक्की घरे बांधण्यात यावीत यासाठी प्रयत्न केले जावेत. कायमस्वरुपी घरांच्या भिंती व छत यांचे स्वरुप खालीलप्रमाणे ठरविण्यात यावे.

१) अशी घरे जी वर्षभरातील विविध मोसमात टिकून राहतील.

२) अशी घरे जेथे आपत्ती प्रतिरोधक तंत्राचा वापर केल्याने जी किरकोळ भुकंप, वादळात व पुरामध्ये टिकून राहतील.

३) भिंती निदान बाहय बाजुने तरी गिलावा केलेल्या असाव्यात.अशा घरामध्ये खालील गोष्टी सुध्दा असाव्यात असे अपेक्षित आहे.

१) उपजीविकेसाठी घरामध्ये पुरेशी जागा असावी.

२) एखादा व्हरांडा असावा.

३) घरावर जाणेसाठी जिना असावा.

४) पावसाच्या पाण्याचा योग्य वापर करण्यासाठीची यंत्रणा असावी.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत ठेकेदाराकडून किंवा अन्य संस्थेकडून घरकुल बांधकामावर बंदी**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधले जाणारे घरकुल हे बांधकाम ठेकेदाराकडून अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाच्या बांधकाम संस्थेमार्फत बांधण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. जर एखाद्या ठिकाणी घरकुलाचे बांधकाम ठेकेदाराकडून किंवा बांधकाम संस्थेकडून झाल्याचे निदर्शनास आले तर, केंद्रशासनाला राज्यशासनाकडून या योजनेअंतर्गत केलेल्या अर्थ पुरवठयातील रक्कम परत मागण्याचा अधिकार आहे.  एका बाजुस सदरचे घरकुल बांधण्याकरिता कोणत्याही ठेकेदाराचा किंवा बाहय संस्थेचा वापर होता कामा नये. तर दुसऱ्या बाजूस सदरचे घरकुल लाभार्थ्यांने स्वत:च बांधावे असा या योजनेचा उद्देश आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद देखिल विविध संस्थांचे सहकार्य घेवून अल्प किंमतीत दर्जेदार घरकुल कशी बांधता येतील? चांगले व स्वस्त बांधकाम साहित्य कोठून व कसे मिळविता येईल? स्थानिक साधन सामुग्रीचा वापर करुन कमी खर्चात दर्जेदार घरकुल कशी बांधता येतील? या संदर्भात माहिती प्राप्त करीत असते आणि मार्गदर्शनाच्या स्वरुपात लाभार्थ्यांने मागीतल्यास किंवा विचारल्यास माहिती पुरवित असे. राज्यसरकार देखील अशी माहिती जिल्हास्तरावर किंवा तालुकास्तरावर उपलब्ध व्हावी यासाठी अन्य विविध संस्थांचे मार्गदर्शन घेवून ती माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करते.

**प्रशिक्षण**

राज्य, जिल्हा तसेच गट विकास पातळीवर इंदिरा आवास योजनेशी संबंधित अधिकाऱ्यांना आपत्ती प्रतिरोधक तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक असून त्यांनी त्यांच्या क्षेत्र भेटी दरम्यान अशा तंत्रज्ञानाचा वापर घर बांधणीत केला गेला आहे. याची खात्री करावी. याशिवाय स्थानिक सुतार, गवंडी यांना त्यांचे कौशल्य वाढीसाठी, स्थानिक सामग्रीचा वापर करुन कमी खर्चातील घरे बांधण्याबाबतचे प्रशिक्षण स्वर्णजयंती ग्रामीण स्वरोजगार योजनेअंतर्गत देण्यात यावे. जिल्हा पातळीवर तसेच गटविकास पातळीवर प्रदर्शने, चर्चासत्र तसेच कार्यशाळांचे आयोजन करुन लाभार्थीमध्ये आपत्ती प्रतिरोधक, पर्यावरण पुरक घरबांधणीच्या तंत्रज्ञनाबाबत जागृती निर्माण करण्यात यावी. यासाठी राज्य ग्रामीण विकास संस्था तसेच, विस्तार प्रशिक्षण केंद्राच्या सेवेचा उपयोग करुन घेण्यात यावा.

**इंदिरा आवास योजनेत स्वयंसेवी संस्थांचा सहभाग**

चांगल्या कामगिरीचा पूर्वेतिहास असलेली योग्य स्थानिक अशासकीय अभिकरणे जेथे जेथे उपलब्ध असतील तेथे तेथे त्यांचे इंदिरा आवास योजनांतर्गत घरांच्या बांधकामात अप्रत्यक्षपणे सहकार्य घेण्यात यावे. या अशासकीय संघटनाकडे बांधकामाचे पर्यवेक्षण, मार्गदर्शन आणि संनियंत्रण यासारखी कामे सोपवता येवू शकतील. विशेषत: स्वच्छता गृहे,

बिनधुराच्या चुली नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर, बांधकाम सामग्री, आराखडा, कमी खर्चाचे बांधकाम तंत्रज्ञान यांचा वापर लोकप्रिय करण्यासाठी अशा अशासकीय संघटनांचा उपयोग करुन घेण्यात यावा. गरज भासल्यास, प्रशिक्षणासाठी राखून ठेवलेल्या निधीचा तसेच संपूर्ण ग्रामीण स्वच्छता अभियानाच्या निधीची सांगड घालून ही कामे केली जावू शकतात.इंदिरा आवास योजनेत काही वेळेस जर उपलब्ध असतील तर चांगल्या, दर्जेदार शासकीय/स्वयंसेवी संस्थांचा अप्रत्यक्षपणे सहभाग असतो.

**बिन धुराची चूल व इतर मुलभूत सोयी**

इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक घरामध्ये, बिनधुराची चूल व स्वच्छता गृहाची बांधणी करावी. इंधनाच्या खर्चात बचत व्हावी, स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरण राखता यावे हा यामागील उद्देश आहे.उर्जा मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारी राजीव गांधी ग्रामीण विद्यूतीकरण योजना, दारिद्रेरेषेखालील कुटुंबाना सर्व मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी इंदिरा आवास योजनेशी संलग्न केली आहे. यासाठी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाकडून इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थींची यादी, राजीव गांधी ग्रामीण विद्यूतीकरण योजनेच्या अधिकाऱ्यांना दिली जाते. ज्यामुळे इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थींना मुफ्त विद्यूत पुरवठा होईल याची खात्री जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाकडून केली जाते.

**इंदिरा आवास योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा**

ज्या ठिकाणी इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुलाकरिता जागा दिलेली आहे, त्या ठिकाणी अगोदरच पिण्याच्या पाण्याची काही सुविधा आहे किंवा नाही हे तपासून पाहिले जाते.जर पिण्याच्या पाण्याची सुविधा नसेल तर त्यांना घरकुलांचे काम सुरु होण्याअगोदर हातपंपाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

**इंदिरा आवास योजने अंतर्गत पुरविण्यात येणारी शौचालयाची सुविधा**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधल्या जाणाऱ्या प्रत्येक घरकुलात शौचालय असणे अनिवार्य आहे. हे शौचालय घरकुलाच्या एका कोपऱ्यात बांधलेले असावे. आरोग्यदायी जीवनासाठी प्रत्येक घरी शौचालय असणे क्रमप्राप्त बाब मानली गेली आहे. शौचालय बांधण्यासोबतच त्याचा पूर्ण वापर करण्यासंदर्भात शासकीय स्तरावरुन मोठया प्रमाणावर प्रयत्न जनजागृती मोहिमेद्वारा चालू आहे.

**इंदिरा आवास योजनेसंदर्भातील बोर्ड/लोगो (माहिती फलक) दर्शविणे**

घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक घरकुलाच्या बाहय भिंतीवर, प्रवेशद्वारा शेजारी इंदिरा आवास योजनेचा लोगो/चिन्ह असलेला माहिती फलक लावण्यात येतो. या माहिती फलकावर इंदिरा आवास योजनेचे नाव, लाभार्थ्यांचे नाव, बांधकामाचे वर्ष इ. बाबींचा समावेश करण्यात येतो याची संबंधित जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणांनी खात्री करावी. याबाबतचा खर्च ठेवीवरील मिळालेल्या व्याजाच्या निधीतून करावा. चिन्हाचा खर्च रु. ३० पेक्षा अधिक होऊ नये.

**इंदिरा आवास योजनेवर देखरेख**

इंदिरा आवास योजनेशी संलग्न असणारे राज्यस्तरीय अधिकारी हे त्यांना नेमून दिलेल्या विभागात/जिल्हयात नियमीतपणे भेटी देतात. इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी समाधानकारक रितीने होत आहे किंवा नाही? घरकुलांचे बांधकाम मार्गदर्शक तत्वाप्रमाणे चालले आहे किंवा नाही? विभागीय स्तरावरुन इंदिरा आवास योजनेचे काम कसे चालले आहे? त्यांच्या अडचणी समजून घेवून सोडविण्यासाठी व त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी या भेटी दिल्या जात असतात. ग्रामीण विकास मंत्रालय व पर्यावरण मंत्रालयाचा प्रतिनिधी प्रत्येक राज्यस्तरीय बैठकीला बोलविला जात असतो. प्रत्येक विभागाकडून राज्य स्तरावर आलेल अहवाल हे राज्यस्तरावरुन केंद्रीय स्तरावर केंदसरकारकडे पाठविले जातात.

**इंदिरा आवास योजनेच्या अमंलबजावणीतील पारदर्शकता**

इंदिरा आवास योजना देशभरात राबविली जाणारी एक महत्वपूर्ण अशी योजना आहे. या योजनेचे कार्यक्षत्र फार मोठे आहे. योजना अंमलबजावणीचे काम फार गुंतागुंतीचे व किचकट आहे. त्यामुळे यात चुका होण्याची किंवा योजनेच्या अंमलबजावणीबाबत लोकांच्या मनात संदिग्धता निर्माण होण्याची मोठी शक्यता असते. अशा चुका होवू नयेत, लोकांच्या मनात योजनेबाबत अनिश्चितता अथवा संदिग्धता असू नये यासाठी योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवण्याचा मोठा प्रयत्न शासनाने केला अहे. सदरची आवास योजना कोणासाठी आहे? सदरची योजना कशासाठी? व का आहे? या योजनेचा नक्की उद्देश काय आहे? या योजनेची अंमलबजावणी कश्या पध्दतीने केली जाते? या सर्व प्रश्नांची उत्तरे सर्वसामान्य नागरिकांना सहज मिळतात व लोकांच्या मनात संदिग्धता राहत नाही. त्यामुळे लोकप्रतिसाद देखील चांगला मिळतो, योग्य मार्गदर्शक तत्वामुळे प्रशासनाला काम करणे सुलभ जाते व योजना राबविण्याचा हेतू सफल होतो. सदरची योजना राबविताना ग्रामस्तरावर, तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर मोठया प्रमाणावर पारदर्शकता ठेवण्यात येतो.

**इंदिरा आवास योजनेअंतर्गत खर्चाचा हिशोब**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे निधी प्राप्त होत असतो आणि तेथूनच निधीचे वाटपा होते. पर्यायाने प्राप्त झालेला एकूण निधी व खर्च झालेला एकूण निधी यांचा मेळ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला ठेवावा लागतो. हा खर्चाचा हिशोब व ताळमेळ ठेवण्यासाठी ग्रामीण विकास व पर्यावरण खात्याने सुचविलेली पध्दत व तत्र या यंत्रणेला वापरावे लागते. गतवर्षाचे आर्थिक व्यवहाराचे हिशोब सर्वसाधारणपणे कार्यकारी मंडळाकडून ३० जून पूर्वी तपासून घ्यावे लागतात. आणि ३१ ऑगस्ट पूर्वी लेखा परिक्षण करुन घ्यावे लागते. लेखा परिक्षणाचे अहवाल सर्वसाधारण कार्यकारी मंडळाने मान्य केल्यानंतर ते राज्याकडे म्हणजे राज्यसरकारकडे व केंद्राकडे ३० सप्टेंबर पर्यंत पाठवावे लागतात.

**इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना मोफत/अल्पदरातील विजमीटर पुरवठा**

इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना सुव्यवस्थीत रितीने प्रकाशमान जीवन जगता यावे, त्यांच्या जीवनातील अंधार दूर व्हावा म्हणून 'राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना' अंतर्गत मोफत/अल्पदरातील विजमीटर पुरवठा केला जातो. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांची यादी विजमहामंडळाकडे दिली जाते व वीज महामंडळ राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजने अंतर्गत मोफत किंवा अल्पदरात विजमीटर पुरवठा करते.

**इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना मिळणाऱ्या इतर योजनांचा लाभ**

इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना या योजनेत अंतर्भुत असणाऱ्या इतर देखील काही योजनांचा लाभ मिळत असतो, त्या योजना खालील प्रमाणे

१. संपूर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत शौचालय बांधण्यासाठी मदत करण्यात येते.

२. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनाअंतर्गत मोफत/ अत्यल्प किंमतीत विज मिटरची सोय करुन देण्यात येते.

३. राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना च्या अंतर्गत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

४. रिझर्व बॅक ऑफ इंडियाया बॅकेने देशातील सर्व राष्ट्रीयकृत बॅकांना निर्देश दिल्यामुळे इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना अल्पव्याजदरातील कर्ज योजनाया योजनेचा लाभ घेता येतो. यामुळे अल्प व्याजदरातील कर्ज इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना उपलब्ध होवू शकते.

५. भारतीय जीवन बिमा प्राधीकरणाच्या माध्यमातून जनश्री विमा योजना व आम आदमी विमा योजनेचा लाभ घेता येतो.

६. इंदिरा आवास योजनेचा लाभ घेणाऱ्या बेरोजगार लाभार्थ्यांकरिता आणखी विशेष योजना तयार करण्यात आलेली आहे. त्यांना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हक्क कायदा, २००५ व स्वयंसहाय्यता गटाचे सदस्यत्व मिळेल व त्या योगे त्यांना राजगाराच्या संधी उपलब्ध होवू शकतील.

**इंदिरा आवास योजनेची उद्देशपूर्ण अनुदान वाटप पध्दत**

१. एकूण अनुदानापैंकी कमीतकमी ६० टक्के अनुदानाची रक्कम ही अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थ्यांकरिता खर्च केली पाहिजे किंवा बाजूला ठेवली पाहिजे.

२. एकूण प्राप्त अनुदानापैंकी जास्तीत जास्त ४० टक्के अनुदान बिगर अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांकरिता खर्च कमी केला पाहिजे.

३. इंदिरा आवास योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान हे विकलांग व्यक्तींकरिता व अल्पसंख्याक व्यक्तीकरिता राज्यसरकारच्या निर्देशानुसार खर्च केले जाते.

४. इंदिरा आवास योजनेतील ३ टक्के अनुदान हे मानसिक व शारिरीकदृष्टया विकलांग असणाऱ्या व्यक्तीकरिता खर्च करण्यात येते.

५. जर एखाद्या ठिकाणी विशिष्ट वर्गातील लोक उपस्थित उपलब्ध नसतील तर संबंधीत अनुदानाची रक्कम दुसऱ्या वर्गातील लोकांकरिता शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे वापरण्यात येते. अर्थात त्याकरिता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची किंवा जिल्हा परिषदेच्या मान्यतेची आवश्यकता असते.

६. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग,१९९२ नुसार अल्पसंख्यांक म्हणजे मुस्लीम, ख्रिश्चन, शिख, बौध्द व पारशी हे लोक आहेत. या धर्मातील लोक आहेत.

**सारांश**

इंदिरा आवास योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, योजनेचा उद्देश, इंदिरा आवास योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया, त्याचे निकष, आवास योजनेतर्गंत घरकुलांचे वाटप, जागेचे निकष, घरकुल बांधणीसाठी निधी विभाजन व वाटपाचे निकष, तसेच ग्रामीण व शहरी भागासाठी असलेले निकष, तांत्रिक व संगणीकरणाचा आधारे पर्यवेक्षण आणि समस्या निराकरण करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून केला गेला आहे. योजनेचा कारभार पारदर्शक ठेवण्यात आला आहे. इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून किती घरकुले पुर्ण व्हावीत याचा निर्णय अधिच करण्यात आलेला असतो. त्यामध्ये काही घरकुले अपुर्ण राहिल्यास किंवा कोणती समस्या निर्माण झाल्यास त्या संदर्भात असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासन विविध उपाय योजना आखत असते. त्यामाध्यमातून लाभार्थ्यां घरकुल निधी योग्य मिळावा आणि तो तात्काळ मिळावा यासाठी शासन सक्रिय असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची**

१. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—१०९८/प्र. क्र.५२ /जल—१७ दि. १२ मे १९९८
२. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—१०९८/स. ८६० जल—१७ दि. २१/०५/१९९८
३. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—१०९९/प्र.क्र.३२/जल —१७. दि. २० एप्रिल १९९९
४. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—१०९९/प्र.क्र.१७ दि. २९ मे १९९९
५. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, स्वग्रास्व १००१/प्र.क्र.२३८/३९ दि. १४ फेब्रुवारी २००१
६. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—२००१/प्र.क्र.२६०/जल १७ दि. ५ जूलै २००२
७. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—२००३/ प्र.क्र.३५०/यो—१० दि. २९ डिसेंबर २००६
८. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र इंआयो—२०१०/प्र.क्र. १२८/योजना —१० दि. २ जुलै २०१०